## निशाणी क्र. ०५ खालील आदेश

अर्जदारांतर्फे प्रस्तुतचा अर्ज सामनेवालाकडून अंतरीम अन्नवस्त्र, औषधोपचार व इतर बाबींसाठी अर्जदार क्र. १ हीस रक्कम दरमहा रूपये १०,०००/- (रूपये दहा हजार फक्त) व अर्जदार क्र. २ यास रक्कम दरमहा रू. ५,०००/- (रूपये पाच हजार फक्त) मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ हीचा विवाह सामनेवाला क्र. १ याचेसोबत दिनांक २८.०५.२०१७ रोजी खरकाडीपुरा, अमरावती येथे बौद्ध धर्मपद्धतीने पार पडला असुन सदरचा विवाहसंबंध अद्याप कायम आहे. सदर विवाह संबंधांतुन त्यांना अश्वद नामक अपत्य दिनांक ३१.०१.२०१९ रोजी झालेले आहे. त्यांचे लग्नाचा खर्च अर्जदाराची आत्या उषा विजय बांगर यांनी केलेला आहे. सदर लग्नाचे वेळी अर्जदाराचे आईवडील हयात नसल्यामुळे अर्जदाराची परिस्थिती गरीबीची असल्याबाबत सामनेवालेंना कळविण्यात आले होते. साखरपुडा झाल्यानंतर सामनेवालाने रक्कम रूपये ५०,०००/- हुंडयापोटी दया, विवाह थाटामाटात करून दया नाहीतर मला लग्न करायचे नाही अशी अट घातली. उसनवारी करून अर्जदाराचे आत्याने सदर रक्कमेची पुर्तता केली. सामनेवालाचे मागणीप्रमाणे विवाहात त्याला एक तोळे सोन्याची अंगठी साखरपुडयामध्ये व दोन तोळे सोन्याची चैन विवाहामध्ये देण्यात आली.

**३.** अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ ही सामनेवालांचे घरी चिंचोली येथे नांदण्यासाठी गेली त्यावेळी तो एकत्र कुटुंबी रहात होता. सुरूवातीचे काही दिवस बरे नांदविल्यानंतर सामनेवाले हे तिला त्रास देवू लागले. परंतु, तरीही अर्जदार क्र. १ ने समजुतीची भुमिका घेतली. ती घरातील सर्व कामे वेळचेवेळी पार पाडत असे. सामनेवाला क्र. १ कामानिमित्त पुणे येथे स्थलांतरीत झाल्याने तो अर्जदार क्र. १ व त्याचे आई, वडील, बहीण व दाजी यांना पुणे येथे रहाण्यास घेवून गेला. तेथे सर्व एकत्र राहत असत. सामनेवाला क्र. १ ची बहीण व आई त्यांना क्षुल्लक कारणांवरून शिवीगाळ करत असत. ही बाब त्यास सांगितली असता तो तिला विनाकारण मारहाण

करत असे व तसे करण्यास त्याची आई व बहीण त्याला प्रोत्साहीत करत असत. नंतर सामनेवाला अर्जदार व आईवडीलांसह भोपाळ येथे स्थलांतरीत झाला. तेथे तो तिला तिच्या आत्या व मावशीशी फोनवरून देखील संपर्क करू देत नसे. त्यामुळे अर्जदाराने तिच्या नातेवाईकांशी संपर्क ठेवला नाही.

४. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, दरम्यान अर्जदार गरोदर राहीली. सदर बाब तिने सामनेवाला क्र. १ यास सांगितली असता त्याने तिला शिवीगाळ केली. सामनेवाला क्र. १ ने तिचा कोणताही दवाखाना केला नाही अथवा दवाखान्यासाठी कोणताही खर्च केला नाही. गरोदरपणामुळे घरातील कामे करणे अर्जदार क्र. १ ला अवघड झाले तेंव्हा सामनेवालाचे आई, बहीण व जावू तिला तुच्छतेने वागवत असत. डिसेंबर २०१८ मध्ये गरोदरपणामुळे अर्जदारास उलटया होवू लागल्या असता सामनवोला क्र. १ने तिला लाथाबुक्यांनी मारहाण केली व दि. २४.१२.२०१८ रोजी तिला तिच्या आत्याची घरी अमरावती येथे नेवून सोडले. वेळेवर जेवण न दिल्यामुळे तसेच सामनेवाला क्र. १ ने केलेल्या मारहाणीमुळे तिचे सिझेरियन करावे लागले. सदर बाळंतपणाचा खर्च अर्जदाराने केला आहे. अश्वद नामक बाळाला जन्म दिल्यानंतर सामनेवाला अगर त्याचे कुटुंबिय तिला व बाळाला बघण्यास आले नाहीत. त्यानंतर दि. ०५.०५.२०१९ रोजी अर्जदार व तिची आत्या बाळासह सामनेवालाचे घरी आले असता त्यांनी त्यांना घरात घेण्यास नकार दिला. अर्जदार व तिच्या घरच्यांनी वारंवार विनवण्या केल्यानंतर त्यांनी तिला घरात प्रवेश दिला.

५. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, दरम्यानच्या कालावधीत संपुर्ण देशात लॉकडाउन असल्याने सामनेवाला क्र. १ चे कामकाज बंद झाल्यामुळे अर्जदाराने घरोघरी जावून धुणेभांडे व स्वयंपाकाची कामे केली. आलेले पैसे सामनेवाला क्र. १ हिसकावून घेत असे व ते स्वत:च्या चैनीसाठी वापरत असे. सामनेवाला क्र. १ यास दारू व गुटख्याचे प्रचंड व्यसन आहे. तो रोज दारू पिवून येवून तिला मारहाण करत असे. अर्जदार थकून आल्यानंतर देखील तो तिला शारीरीक संबंधासाठी जबरदस्ती करत असे. सामनेवाला क्र. १ यास अश्लिल व्हिडीओ बघण्याचे वेड असुन अर्जदाराला मासिक पाळी आलेली असतांना तसेच तिने नकार दिला असतांना देखील तो जबरदस्तीने तिच्याशी शारीरीक संबंध ठेवत असे.

६. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, मे २०२१ च्या दरम्यान सामनेवालाने अर्जदाराकडे बोलेरो गाडी घेण्यासाठी रू. १ लाखाची मागणी केली, परंतु अर्जदाराकडे तेवढी रक्कम शिल्लक नसल्याने सामनेवालाने अर्जदारास शिवीगाळ व मारहाण केली. मार्च २०२२ मध्ये सामनेवालाचे दारूचे व्यसन प्रचंड वाढले. सामनेवालास त्याबाबत समजावले असता सामनेवाला व त्याच्या आईने ''तुला एक वेळचे जेवण भेटते तेवढे नशिब समज, माझा मुलगा त्याच्या पैशांची दारू पितो'' असे बोलून बाळासह तिला रात्रीच घराबाहेर काढले. त्यामुळे संपुर्ण रात्र अर्जदारास बाळासह घराबाहेर काढावी लागली. अर्जदार माहे २०२२ मध्ये दुस-यांदा गरोदर राहीली असता सामनेवाला तिचेवर संशय घेवून तिला मारहाण करत असे. बाळ माझे नाही व मला बाळच नको असे म्हणून त्याने तिला गर्भपाताच्या गोळया दिल्या. केलेल्या मारहाणीमुळे व दिलेल्या गोळयांमुळे अर्जदारास मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला; परंतु तरीदेखील सामनेवालाने तिला दवाखान्यात नेले नाही.

७. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, दिनांक ०३.०९.२०२२ रोजी सामनेवालेने मध्यरात्री दारू पिवून येवून अर्जदारास प्रचंड मारहाण केली व एका वस्त्रानिशी तिला व तिचे मुलास घराबाहेर काढून दिले. विनवण्या करून देखील त्याने तिला घरात घेतले नाही. त्यामुळे ०४.०९.२०२२ रोजी अर्जदाराने सामनेवालांविरूद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. पोलीस स्टेशनला बोलावण्यात आल्यानंतर देखील त्यांनी अर्जदाराच्या चारीत्रावर संशय घेवून अर्जदाराला नांदविण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे नाईलाजाने तिला तिच्या आत्याच्या घरी जावे लागले. आत्याच्या घरी काही दिवस राहील्यानंतर तिची मावशी तिला तिचे घरी राहण्यास घेवून गेली. अनेक प्रयत्न करून देखील सामनेवालाने अर्जदारास नांदण्यास नेलेले नाही. त्यामुळे त्यास दिनांक १४.०३.२०२३ रोजी नोटीसस पाठवूनही तो तिला नांदण्यास घेवून गेलेला नाही. उलट त्याने नोटीस उत्तर पाठवून तिच्यावर खोटे आरोप केले.

८. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार तिच्या मावशीच्या घरी आश्रीतासारखे जिवन जगत असुन तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिचा व तिचे मुलाचा दवाखाना, तिचे राहणे व जीवनाचे सर्व अन्न, वस्त्र, निवारा यासाठी तिला मावशी व इतर नातेवाईकांवर अवलंबुन रहावे

लागते. याउलट सामनेवाला याची चिंचोली शिंगणे येथे वडीलोपार्जित बागायत शेतजमीन आहे, तसेच तो इतरांची जमीन करतो. यातुन त्याला वार्षिक अंदाजे रू. ७ ते ८ लाख उत्पन्न मिळते. त्याचे घरी दुभत्या गाई असुन त्यापासुन त्यास रू. ३० ते ३५ हजार दरमहा उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. २ ते ४ शेती करत असुन त्यांना देखील चांगले उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. ४ हा खाजगी नोकरी करत असुन त्यातुन देखील त्याला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते. सामनेवालेवर अर्जदार व तिचे मुल सोडून इतर कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे सामनेवालाची तिला खावटी देण्याची ऐपत आहे. न्यायालयात तिला तसेच तिच्यासोबत एक इसमास येण्यासाठी लागणारा खर्च व वकील फिसाठी लागणारा खर्च तसेच तिच्या अन्नवस्त्राची, वैद्यकीय खर्चासाठी व इतर खर्चासाठी अर्जदारास दरमहा रूपये १०,०००/- व तिचे मुलास रू. ५,०००/- अंतरीम पोटगीपोटी मिळावेत अशी अर्जदाराची मागणी आहे.

९. सामनेवालांतर्फे निशाणी क्र. १४ अन्वये मूळ अर्जास व अंतरीम अन्नवस्त्र मिळणेच्या प्रस्तुतच्या अर्जास जबाब दाखल करण्यात आला आहे. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ सोबत विवाह व विवाह संबंधांतुन त्यांना एक मुलगा झाल्याची बाब मान्य केली आहे. परंतु त्यांनी हुंडयाची व रू. ५० हजाराची मागणी तसेच एक तोळा सोन्याची आणि २ तोळा सोन्याच्या चैनची मागणी केल्याची बाब नाकारली आहे. त्यांचे पुढे कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ चे सामनेवाले क्र. १ सोबत लग्न होण्यापुर्वी एक लग्न झालेले होते. तिच्या आत्याने सदरची माहीती सामनेवालेस दिली नाही. त्यांना सदरची माहीती इतरांकडून मिळाली. त्याचप्रमाणे ती तिथे २-३ महीनेच राहीली. तिची वागणूक चांगली नसल्याने तिच्या नव-याने तिला नांदविले नाही. असे असतांना देखील सामनेवालेने तिचा स्विकार केला.

१०. सामनेवालांचे पुढे असे कथन आहे की, गावात काम नसल्यामुळे अर्जदार क्र. १ व सामनेवाले क्र. १ काम शोधण्यासाठी पुणा येथे स्थलांतरीत झाले. तेथे अर्जदार क्र. १ काही दिवस चांगली राहीली. सामनेवाले क्र. १ कामावर जात असे तेंव्हा अर्जदार क्र. १ ही च्या मैत्रिणीचे लग्नाव्यतिरीक्त अनैतिक संबंध असलेल्या व्यक्तीबरोबर अर्जदार क्र. १ ही तिच्या मैत्रिणीला

वाईट कार्य करण्यासाठी तिची स्वत:ची राहती रूम वाईट कामाकरीता वापरण्यासाठी देत असे व मैत्रिणीच्या मुलाला बाहेर दुकानात घेवून जात असे. सामनेवाले क्र. १ अचानक कामावरून घरी आला असतांना घरातील दरवाजा उघडताच त्याच्या नजरेस लज्जास्पद प्रकार बघून अर्जदार क्र. १ ला विचारणा केली असता तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. उलट सामनेवाले क्र. १ वर आरोप करून अर्जदार क्र. १ ही नेहमी वाद घालून सामनेवाले क्र. १ ला मानसिक त्रास देत असे. उपरोक्त द्रृष्य पाहिल्याने सामनेवाले क्र. १ चे कामात मन लागत नसे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व सामनेवाले क्र. १ हे दोघेही चिंचोली शिंगणे येथे त्यांच्या राहत्या घरी आले व त्याच काळात अर्जदार क्र. १ चे बाळंतपण सामनेवााले क्र. १ च्या राहत्या घरी चांगल्या पद्धतीने झाले.

**११.** सामनेवालांचे पुढे असे कथन आहे की, काही दिवस चिंचोली शिंगणे येथे राहील्यानंतर सामनेवाले क्र. १ व अर्जदार क्र. १ हे कामानिमित्त भोपाळ येथे सामनेवाले क्र. ६ कडे काम मिळेपर्यंत एक महीना राहीले. त्यानंतर नोकरी मिळाल्यानंतर ते भाडयाच्या घरात राहू लागले. तिथे सामनेवाले क्र. ६ ने अर्जदार क्र. १ हीस घरगुती कामासाठी लावून दिले, जिथे तिला दरमहा रू. १० ते १२ हजार कामाचे मिळत असत. ते पैसे ती सामनेवालेस दाखवत नसे व तिची आत्या उषा बांगर हीस पाठवत असे. कधीतरी ती घरात फक्त २ ते ३ हजार रूपये देत असे. सामनेवाले क्र. १ च्या पगारातुन येणारे पैशातुन उदरनिर्वाह होत नसल्याने त्याने तिच्याकडे विचारपुस केली असता ती नेहमी भांडण करून विविध आरोप करत असे. तिने तिच्या आत्याला बोलावून घेतले व त्याचे काही कपडे जाळून तर काही कपडे घरातुन बाहेर फेकून दिले आणि त्याची गरज नाही असे म्हणून त्यास घरातुन हाकलून दिले.

**१२.** सामनेवालांचे पुढे असे कथन आहे की, उपरोक्त परिस्थितीमुळे सामनेवाले क्र. १ हा सामनेवाले क्र. ६ कडे रहायला गेला. सामनेवाले क्र. १, ६ व ७ हे अर्जदार क्र. १ ला समजावून सांगण्यास गेले असता अर्जदाराच्या आत्याने अश्लील शब्द वापरून सामनेवालेंचा अपमान केला. त्यामुळे ते परत आले. त्यानंतर सामनेवाले क्र. १ हा एकटाचा चिंचोली शिंगणे येथे निघुन आला. त्यानंतर अर्जदार क्र. १ व तिची आत्या काही महीने भोपाळ येथे

राहील्यानंतर सामनेवाले क्र. १ यास न विचारता त्या तेथील सामान घेवून अमरावतीला निघुन गेल्या. ७ महीन्यांपासुन अर्जदार क्र. १ तिच्या आत्यासोबत राहते व सामनेवाले क्र. १ यास फोन करून नेहमीच अश्लील शब्दात शिवीगाळ करून अपमानास्पद बोलते. सामनेवाले क्र. १ व त्याचे कुटुंबियांवर आरोप करून त्या त्याच्या कुटुंबाची बदनामी करत आहेत.

**१३.** सामनेवालांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ हिने सामनेवाले क्र. १ यास दिनांक १४.०३.२०२३ रोजी नोटीस पाठविली असता सामनेवाले क्र. १ व २ हे तिला नांदण्याकामी घ्यावयास गेले असता अर्जदार क्र. १ ने नांदायला येण्यास नकार दिला व त्यांना अपमान करून परत पाठविले. तिने स्वत:हून सामनेवाले क्र. १ चा त्याग केला आहे. सामनेवाले क्र. १ हा मजुरी करून उदरनिर्वाह करतो. त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्याचेवर त्याच्या वृद्ध आईवडीलांची जबाबदारी आहे. याउलट अर्जदार क्र. १ ही चैनीचे जिवन जगत आहे. ती धुणी भांडी करून दरमहा रू. ३० ते ४० हजार रूपये उत्पन्न मिळविते व त्यातुन ती स्वत:चा व मुलाचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. अर्जदार क्र. १ हीचे स्त्रीधन हे तिच्याकडेच आहे. या सर्व बाबींमुळे उदरनिर्वाहासाठी रक्कम मागणेचा अर्जदारास कोणताही हक्क नाही. त्यामुळे अर्जदाराचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

**१४.** अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवालांतर्फे कोणीही युक्तिवादासाठी हजर न राहील्याने त्यांचे युक्तिवादाशिवाय अर्ज पुढे चालविण्यात आला. अभिलेख पाहीले.

**१५.** प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मुददे् माझ्या विवेचनाकरीता उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवीत आहे :-

| **अ.क्र.** | **मुददे्** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | .अर्जदारांना सकृतदर्शनी केस आहे काय ? | ....अंशत: होय. |
| २ | अर्जदारांना सकृतदर्शनी सिध्द् केले आहे काय की, सामनेवाला क्र. ०१ ने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकडे पुर्णपणे दुर्लक्षित केले आहे अथवा त्यांना सांभाळण्यास त्याने पुर्णपणे नकार दिला आहे? | ....अंशत: होय. |
| ३ | अर्जदारांनी सकृतदर्शनी सिध्द् केले आहे काय की, त्यांची उपजिवीका करण्याची असमर्थता असून | |

| | | |
|---|---|---|
| | सामनेवाला क्र. ०१ याची त्यांचा उदरनिर्वाह करण्याची पुरेपूर क्षमता आहे? | ....अंशतः होय. |
| ४ | अर्जदार हे सामनेवाला क्र. ०१ याचेकडून अंतरिम पोटगीचा आदेश मिळणेस पात्र आहेत काय? असल्यास कोणत्या दराने व केव्हापासून? | ....अंशतः होय, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ५ | आदेश काय ? | ..... अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुददे क्र. ०१ ते ०४ करीता</u>** :-

**१६.** सदर मुददे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे. अर्जदारांनी निशाणी क्र. ०३ सोबत अर्जदारांचे आधारकार्डची छायांकित प्रत, लग्नपत्रिकेची छायांकित प्रत, विवाहासमयीची छायाचित्रे, अर्जदार क्र. २ च्या जन्मप्रमाणपत्राची छायांकित प्रत, अर्जदार क्र. १ हीने सामनेवाला क्र. १ व ६ यांच्याविरूद्ध पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत, अर्जदार क्र. १ कडून सामनेवाला क्र. १ यास दिनांक १४.०३.२०२३ रोजी पाठविलेल्या नोटीसची छायांकित प्रत, सदर नोटीस पाठविल्याची पोस्टाच्या पावतीची छायांकित प्रत, सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ ला पाठविलेले दिनांक २१.०३.२०२३ रोजीचे नोटीस उत्तराची प्रत इ. कागदपत्रे दाखल केले आहेत. अर्जदार क्र. १ हीने तिचे मालमत्ता व दयित्वाचे शपथपत्र निशाणी क्र. १६ वर दाखल केले आहे. सामनेवाला यांचेतर्फे सामनेवाले क्र. १ च्या आधारकार्डची छायांकित प्रत, त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत, जातीचे प्रमाणपत्राची व शिधापत्रिकेची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. सामनेवाले क्र. १ तर्फे प्रस्तुत प्रकरणात मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र सादर करण्यात आले नाही.

**१७.** अभिलेखावर आलेले दोन्ही पक्षकारांचे अभिकथन व कागदपत्रे पाहिली असता, अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह झाल्याची, सदर विवाह संबंध कायम असल्याची बाब तसेच सदर विवाह संबंधांतुन मुलगा अश्वद हे अपत्य असल्याची बाब वादातीत नाही. प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र. १ हीने सामनेवाला क्र. १ व इतर सामनेवाले यांचेविरूद्ध त्यांनी शारीरीक व मानसिक छळ करून तिला दिनांक ०३.०९.२०२२ रोजी मुलासह घरातुन बाहेर हाकलून दिल्याचे कथन मांडले आहे. सामनेवाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ ही

सध्या अर्जदार क्र. २ सोबत तिच्या मावशीच्या घरी राहत असल्याचे देखील नाकारलेले नाही. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ हीने स्वत:हून त्याचा त्याग केला असल्याचे कथन मांडले आहे. अर्जदार क्र. १ ने अर्जात सामनेवाला क्र. १ ते ७ यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे मुळ अर्जात कथन मांडले असून सामनेवाला क्र. १ ने ते नाकारले आहेत. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ सोबत कोणत्या कारणावरून तिच्या मावशीच्या घरी राहत आहे, ही बाब उभय पक्षकारांकडून सादर होणा-या मौखिक व लेखी पुराव्यावरून गुणवत्तेवर तपासून पहावी लागणार आहे. तथापि, अर्जदार क्र. १ ही सामनेवाला क्र. १ ची कायदेशिर पत्नी असल्याचे व अर्जदार क्र. २ हा त्या दोघांचा मुलगा असल्याचे दिसून आल्याने एक 'पती व पिता' म्हणून त्याने त्या दोघांना सांभाळण्याची त्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे.

१८. अर्जदार क्र. १ हीने सामनेवाला क्र. १ यास शेतजमिनीमधून वर्षाला रू. ७ ते ८ लाख रूपये, दुभत्या गायीपासुन दरमहा रक्कम रू. ३० ते ३५ हजार इतके उत्पन्न मिळत असल्याचे कथन मांडले आहे. सामनेवाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ हीला धुणीभांडी करून दरमहा रक्कम रू. ३० ते ४० हजार इतके उत्पन्न मिळत असुन ती स्वत:चा व मुलाचा सांभाळ करण्यास समर्थ असल्याचे कथन मांडले आहे. सामनेवाला क्र. १ यास हाताला मिळेल ते मजुरीचे काम करून तो पोट भरत असल्याचे, त्यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे व त्याचेवर त्याचे वृद्ध आईवडील यांच्या पालनपोषणाची जबाबदारी असल्याचे देखील पुढे त्याने कथन मांडले आहे. निशाणी क्र. १६ वरील शपथपत्रात अर्जदार क्र. १ हिने तिला उत्पन्नाचे साधन नसल्याचे नमूद केले आहे. सामनेवाला क्र. १ याने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र सादर केले नाही. अर्जदार क्र. १ ही आजमितीस स्वत:चा व मुलाचा चरितार्थ सांभाळण्यास समर्थ असल्याबाबत सकृतदर्शनी ठोस पुरावा न आल्याने ती त्यास असमर्थ आहे, असेच सध्या सकृतदर्शनी अनुमान काढावे लागेल.

१९. सामनेवाले क्र. १ च्या कथनानुसार तो हाताला मिळेल ते मजुरीचे काम करून पोट भरतो. त्यामुळे त्याचे सध्याचे वय व प्रकृती लक्षात घेता, तो सामान्य परिस्थितीमध्ये स्वत:चे उत्पन्न कमाविण्यास सक्षम आहे, असे अनुमान सदयस्थितीत काढता येईल.

**२०.** अर्जदार हे अर्जदार क्र. १ च्या मावशीकडे रहात असल्यापासून सामनेवाला क्र. ०१ ने त्यांच्या उपजिवीकेसाठी काय सोय केली, हे त्याच्या म्हणण्यात स्पष्ट केले नाही. अर्जदारांनी उदरनिर्वाहासाठी अर्ज दाखल करेपर्यंत सामनेवाला क्र. ०१ ने त्यांना कोणत्या सुविधा पुरविल्या, हे अभिलेखावर सकृतदर्शनी आले नसल्याने एक 'पती व पिता' म्हणून त्याने कायदेशिर व नैतिक दायित्व निभावले नाही, असेच सकृतदर्शनी दिसून येते. शिवाय, अर्जदार क्र. १ हिस उत्पन्नाचे साधन असलेबाबत सकृतदर्शनी पुरावा सामनेवाला क्र. १ याने सादर केला नाही. त्यामुळे दैनंदिन आयुष्य जगण्यासाठी अर्जदारांना अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल.

**२१.** अर्जदारांच्या मुलभूत गरजा, सदयस्थितीतील महागाई, अर्जदारांचे आरोग्य, सामनेवाला क्र. ०१ याचे उत्पन्नाचे साधनाबाबतचे अनुमान, त्याचेवर अवलंबून असणा-या कुटूंबियांची संख्या आणि उभय पक्षांचा असलेला राहणीमानाचा दर्जा इत्यादी बाबी प्रथमदर्शनी पाहिल्या असता, अर्जदारास मुळ अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र. १ हीस दरमहा रक्कम रू. २,०००/ -(रूपये दोन हजार फक्त) व अर्जदार क्र. २ यास दरमहा रक्कम रू. १,०००/ - (रूपये एक हजार फकत) या दराने सामनेवाला क्र. ०१ कडून मिळणेचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब, मुददा क्र. ०१ ते ०४ चे निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदविले आहे.

**<u>मुददा क्र. ०५ करीता</u>** :-

**२२.** उपरोक्त मुददे क्र. ०१ ते ०४ करता केलेल्या विवेचनाच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज हा अंशत: मंजूर होणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :-

**-: आदेश :-**

१ अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२ सामनेवाला क्र. १ ने अर्ज दाखल तारखेपासून अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अर्जदार क्र. १ हीस दरमहा रक्कम रू. २,०००/ -(रूपये दोन हजार फक्त) व अर्जदार क्र. २ यास

दरमहा रक्कम रू. १,०००/ - (रूपये एक हजार फकत) या दराने अंतरिम पोटगी दयावी.

३ प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यास विनामूल्य देण्यात यावी.

सही/-

( **आर. आर. कुलकर्णी** )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सिन्नर न्यायालय, सिन्नर

ठिकाण :- सिन्नर.
दिनांक :-०७/०१/२०२५.